**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांची भेट ( 25 जुलै 2025)**

25 जुलै 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज माले येथील राष्ट्राध्यक्ष कार्यालयात मालदीवचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइज्जू यांची भेट घेतली. या बैठकीपूर्वी मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांनी पंतप्रधान मोदी यांचे स्वागत केले. रिपब्लिक स्क्वेअर येथे औपचारिक स्वागत करण्यात आले. अगत्यपूर्वक भेट पार पडली. उभय देशांमधील दृढ रुजलेली मैत्री प्रतिबिंबित करणारी भेट ठरली.

2. पंतप्रधानांनी आपले आणि शिष्टमंडळाचे आदरातिथ्य केल्याबद्दल मनापासून प्रशंसा केली आणि मालदीवच्या स्वातंत्र्यदिनाच्या 60 व्या वर्षपूर्तीच्या निमित्तानं तसेच उभय देशांमधील राजनयिक संबंध प्रस्थापनेला 60 वर्ष पूर्ण झाल्या निमित्तानं शुभेच्छा दिल्या.

3. उभय नेत्यांनी अनेक शतकांपासून निर्माण झालेल्या मैत्री आणि विश्वासाच्या खोलवर रुजलेल्या नात्यावर चिंतन केले. उभय देशांतील नागरिकांच्या परस्पर बंधाने दृढ बनले आहे. ऑक्टोबर 2024 मध्ये मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांच्या भारत भेटीदरम्यान स्वीकारण्यात आलेल्या 'व्यापक आर्थिक आणि सागरी सुरक्षा भागीदारी' प्रति भारत-मालदीव संयुक्त दृष्टीकोनाच्या अंमलबजावणीमधील प्रगतीचा देखील ' उभय नेत्यांनी आढावा घेतला. '. "शेजारी प्रथम" आणि 'व्हिजन महासागर (MAHASAGAR) धोरणाला अनुसरून, ' मालदीव बरोबरचे संबंध अधिक दृढ करण्याप्रति भारताच्या वचनबद्धतेचा पंतप्रधान मोदी यांनी पुनरुच्चार केला. राष्ट्राध्यक्ष मुइझ्जू यांनी यावेळी कोणत्याही आपत्ती काळात मालदीवला प्रथम प्रतिसाद देणाऱ्या भारताच्या वचनबद्धतेचं कौतुक केलं. उभय नेत्यांनी विकास भागीदारी, पायाभूत सुविधा सहाय्य, क्षमता विकास, हवामान कृती आणि आरोग्य क्षेत्रातील सहकार्यावर विचारांचे आदान-प्रदान केले. संरक्षण आणि सागरी सुरक्षा सहकार्य अधिक बळकट करण्याचे आवाहनही उभय नेत्यांनी केले. आणि या संदर्भात कोलंबो सुरक्षा परिषदेअंतर्गत उभय देशांमधील सहकार्याची नोंद घेतली.

4. उभय नेत्यांनी दोन्ही देशांमधील आर्थिक भागीदारीचाही सर्वंकष आढावा घेतला. प्रस्तावित मुक्त व्यापार करार आणि द्विपक्षीय गुंतवणूक करार उभय बाजूंसाठी नवीन संधींचा मार्ग प्रशस्त करतील ही बाब पंतप्रधानांनी अधोरेखित केली. उभय देशांनी, विशेषतः पर्यटनाला चालना देण्यासाठी डिजिटल अर्थव्यवस्थेचा लाभ घ्यायला हवा असे नमूद केले. UPI स्वीकारणं, रुपे कार्ड स्वीकारणं आणि स्थानिक चलनातील व्यापाराबाबत उभय देशांमध्ये नुकत्याच पार पडलेल्या सामंजस्य कराराचं स्वागत केलं. उभय नेत्यांनी अधोरेखित केलं की, उभय देशांमधील दृढ विकास भागीदारी, परस्परांच्या नागरिकांत यापूर्वीच घनिष्ठ असलेल्या संबंधांमध्ये मोलाची भर घालत आहे.

5. उभय नेत्यांनी नमूद केले की, ग्लोबल साऊथ मधील भागीदार म्हणून तसेच पृथ्वी ग्रह आणि तेथील नागरिकांच्या हितासाठी हवामान बदल, अक्षय ऊर्जेला प्रोत्साहन, आपत्ती जोखीम कमी करणं आणि हवामान विज्ञान यासारख्या मुद्द्यांवर काम करत राहतील.

6. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केल्याबद्दल आणि दहशतवादाविरोधातील लढाईत भारताप्रति एकात्मतेची भावना प्रदर्शित केल्याबद्दल पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष मुइझ्झू यांचे आभार मानले.

7. उभय नेत्यांच्या उपस्थितीत मासेमारी आणि मत्स्यपालन, हवामानशास्त्र, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, UPI, भारतीय औषधकोश आणि सवलतीची कर्ज मर्यादा यासंबधी क्षेत्रासह एकूण 6 सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. नवीन कर्ज मर्यादे अंतर्गत भारताने मालदीव मधील पायाभूत सुविधा विकास आणि अन्य उपक्रमांसाठी 4850 कोटी रुपये [सुमारे 550 दशलक्ष अमेरिकन डॉलर] देऊ केले आहेत. विद्यमान कर्ज मर्यादांमध्ये सुधारणा करणाऱ्या करारावरही स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यामुळे मालदीवची वार्षिक कर्ज परतफेड 40% ने कमी होईल. [ 29 कोटी अमेरिकन डॉलर्स वरून 51 कोटी अमेरिकन डॉलर्स]. उभय बाजूंनी प्रस्तावित मुक्त व्यापार कराराच्या संदर्भाच्या अटींचे आदान-प्रदान केले.

8. उभय नेत्यांनी अड्डू शहरातील रस्ते आणि सांडपाणी प्रणाली प्रकल्प आणि अन्य शहरातील 6 उच्च प्रभावी सामुदायिक विकास प्रकल्पांचे दूरदृश्य प्रणाली मार्फत लोकार्पण केले. पंतप्रधानांनी मालदीव साठी 3,300 सामाजिक गृहनिर्माण युनिट्स आणि मालदीव राष्ट्रीय संरक्षण दल आणि इमिग्रेशन अधिकाऱ्यांसाठी 72 वाहने सुपूर्द केली.

9. पंतप्रधानांनी आरोग्य मैत्री हेल्थ क्यूब [BHISHM] संचाचे दोन युनिट्स मालदीव सरकारला सुपूर्द केले. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज हे क्यूब 200 जखमींना तत्काळ वैद्यकीय मदत पुरवू शकते तसेच सहा वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या पथकाला 72 तासांपर्यंत काम करण्यासाठी अंगभूत आधार देऊ शकते.

10. निसर्ग संवर्धनाप्रती असलेल्या दृढ बांधिलकीचे प्रतीक म्हणून उभय नेत्यांनी भारताच्या "एक पेड माँ के नाम" (आई साठी वृक्षारोपण) मालदीवच्या "5 लाख वृक्षारोपणाची प्रतिज्ञा" मोहिमेचा भाग म्हणून आंब्याची रोपे लावली.

11. पंतप्रधानांनी मालदीव आणि तेथील नागरिकांना त्यांच्या गरजा आणि प्राधान्यांनुसार मदत करण्याच्या तसेच हिंद महासागर क्षेत्रात शांतता, प्रगती आणि समृद्धीसाठी सहयोग देण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

**माले**

25 जुलै 2025